# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date 13 August 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १३ ऑगस्ट २०२४ दुपारी १.०० वा.

****

विदर्भ आणि मराठवाड्यातल्या दुग्ध विकासाला गती देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज ही बैठक झाली. यासाठी १४९ कोटी रुपयांना देखील यावेळी मान्यता देण्यात आली.

मराठवाड्यातल्या खालसा झालेल्या वर्ग दोनच्या इनाम आणि देवस्थानच्या जमिनी वर्ग एक करण्याचा, यंत्रमागांना अतिरिक्त वीजदर सवलतीसाठी नोंदणीची अट मार्च २०२५ पर्यंत शिथील करण्याचा, तसंच नगराध्यक्षांचा कालावधी अडीच ऐवजी पाच वर्ष करण्याचा निर्णयही मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

****

'हर घर तिरंगा' मोहिमेअंतर्गत आजपासून आपापल्या घरावर तिरंगा फडकवून स्वातंत्र्यदिनाच्या उत्सवात सहभागी होण्याचं आवाहन सरकारने केलं आहे. या मोहिमेअंतर्गत उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी नवी दिल्लीत भारत मंडपम इथून तिरंगा बाईक रॅलीला हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केली. या बाईक रॅलीमध्ये लोकसभा आणि राज्यसभेतले खासदार सहभागी झाले होते.

नागपूर इथं देखील आज तिरंगा मॅरेथॉन घेण्यात आली. नागरिक मोठ्या संख्येनं या मॅरेथॉनमध्ये सहभागी झाले होते.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वेरूळ इथं आज शालेय विद्यार्थ्यांनी शंभर फूट तिरंगा प्रभातफेरी काढली.

****

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी अहिल्याबाई होळकर यांना त्यांच्या पुण्यतिथी निमित्त आदरांजली वाहिली. अहिल्याबाई होळकर यांनी देशभरातल्या तीर्थक्षेत्रांचा जीर्णोद्धार करून आणि मंदिरे बांधून सनातन संस्कृतीच्या संवर्धनात अतुलनीय योगदान दिलं, अशा शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या.
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही ट्विट संदेशाच्या माध्यमातून अहिल्याबाई होळकर यांना अभिवादन केलं.

****

कोलकाता इथल्या डॉक्टर महिलेवर झालेल्या अत्याचार आणि हत्येच्या घटनेच्या निषेधार्थ, निवासी डॉक्टरांचा देशव्यापी संप सुरू आहे. या संपाला प्रतिसाद देण्यासाठी मुंबईतल्या विविध रुग्णालयांमधल्या निवासी डॉक्टरांनी आंदोलन सुरू केलं आहे. निवासी डॉक्टरांची राज्य संघटना – मार्डच्यावतीनं, या प्रकरणाची केंद्रीय तपास यंत्रणेमार्फत चौकशी व्हावी अशी मागणी करण्यात आली आहे. साडे तीन हजार निवासी डॉक्टर या आंदोलनात सहभागी झाले आहेत.

****

राज्यात उदंचन जलविद्युत विकसित करण्यासंदर्भात जलसंपदा, महाजनको, द टाटा पॉवर लिमिटेड आणि अवाडा ग्रुप यांच्यामध्ये काल सामंजस्य करार झाला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मुंबईत हा कार्यक्रम झाला. हा उपक्रम महाराष्ट्राच्या ऊर्जा निर्मिती धोरणाचा मुख्य आधारस्तंभ आहे असं फडणवीस म्हणाले. या कराराच्या माध्यमातून राज्यात २४ हजार ६३१ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे; याद्वारे पाच हजार ६३० मेगावॅट क्षमतेच्या वीजनिर्मितीचं उद्दीष्ट असून दहा हजार ३०० जणांना रोजगार मिळेल असा अंदाज आहे.

****

लोकसभा निवडणुकीत विरोधकांच्या खोट्या कथानकाचा फटका महायुतीच्या उमेदवारांना बसला, मात्र विधानसभेत गाफील राहू नका, अशा प्रकारे कोणी खोटे कथानक बसवत असेल, तर त्याला कडाडून विरोध करत प्रत्युत्तर द्या, असं आवाहन उद्योग मंत्री उदय सामंत यांनी कार्यकर्त्यांना केलं आहे. नाशिक इथं काल आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीच्या नेत्यांची समन्वय बैठक सामंत यांच्या उपस्थितीत पार पडली, त्यावेळी ते बोलत होते. विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारने केलेलं काम लोकांपर्यंत पोहोचवा असंही त्यांनी सांगितलं.

****

धाराशिव तालुक्यात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान कक्षाअंतर्गत तिरंगा ध्वज, राख्या आणि शालेय साहित्याची विक्री करण्यात येत आहे. या दरम्यान कानगरा इथल्या एनपीके महिला उत्पादक गटाची काल दिवसभरात तीन लाख रुपयांच्या साहित्याची विक्री झाली. तसंच या उपक्रमाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद दिसून येत आहे.

****

लातूर तालुक्यातल्या बोरगाव काळे इथं एका कार्यक्रमासाठी आलेले लातूर ग्रामीणचे काँग्रेस आमदार धीरज देशमुख यांना मराठा आंदोलकांनी घेराव घालून काही प्रश्न उपस्थित केले. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यासाठी महाविकास आघाडी काय करत आहे. अशी विचारणा या आंदोलकांनी केली. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातलं आरक्षणासाठी काँग्रेस पक्ष आणि महाविकास आघाडीने आपली भुमिका स्पष्ट करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. आम्ही सर्वांनी मागणी करण्याचं काम केलं आहे, आता सरकारने याबाबत निर्णय घ्यावा, असं देशमुख यावेळी म्हणाले.

****

जालना जिल्ह्यातल्या भोकरदन तालुक्यात स्वस्त धान्य दुकानातल्या तांदळाची काळ्या बाजारात विक्री करणाऱ्या एका ट्रक सह दहा टन तांदूळ असा २८ लाख रूपयांचा मुद्देमाल पोलिसांनी पकडला. पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांच्या पथकानं ही कारवाई केली.

****

लोककलेची माहिती आणि महती बालकांपर्यंत, नव्या पिढीपर्यंत पोहोचावी यासाठी बालरंगभूमी परिषदेने ‘जल्लोष लोककलेचा’ हा उपक्रम आयोजित केला आहे.

****